


आपले श्रध्दास्थान

# डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बँक लि., अमरावती

## मुख्य कार्यालय, इर्विन चौक, अमरावती.

र.जि.नं. : ए.टी.आय/बी.एन.के/१०१

## वार्षिक साधारण सभेची सूचना

## सन २०२५-२६



संस्थापक अध्यक्ष
स्व. ॲड. एम.एम.पाटील

---

बँकेच्या सर्व सन्माननीय भागधारक सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ५३ वी वार्षिक साधारण सभा रविवार, दिनांक २०/०९/२०२६ रोजी, दुपारी १:०० वाजता मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृह (परिचर्या महाविद्यालय) अमरावती येथे खालील विषयावर विचार विनिमय करण्याकरिता होईल. तरी कृपया सर्व सन्माननीय सभासदांनी सभेस उपस्थित राहण्याचे करावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय -**

१. मागील दिनांक २१ सप्टेंबर २०२५ रोजीच्या वार्षिक साधारण सभेची कार्यवाही वाचून कायम करणे.
२. बँकेच्या दिनांक ३१.०३.२०२६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल वाचून त्यास मंजूरी देणे.
३. सन २०२५-२६ चा वार्षिक अहवाल, बँकेचे संचालक मंडळाने सादर केलेला २०२५-२६ चा लेखा परिक्षित ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मंजूरी देणे.
४. संचालक मंडळाने सुचविलेल्या नफ्याच्या विभागणीस मान्यता देणे.
५. बँकेचे सन २०२५-२६ चे अंदाजपत्रकातील ओलांडलेली तरतुद मंजूर करणे.
६. बँकेचे संचालक मंडळाने सादर केलेले सन २०२६-२७ चे अंदाज पत्रक मंजूर करणे.
७. बँकेचा सन २०२५-२६ चा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल व त्यावरील बँकेने तयार केलेला दोष दुरुस्ती अहवाल मंजूर करणे.
८. सन २०२७-२८ करीता बँकेसाठी समवर्ती व अंतर्गत लेखा परिक्षकांची नियुक्ती करणेबाबत संचालक मंडळाची शिफारस विचारात घेणे.
९. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखा परिक्षणासाठी सनदी लेखाकार यांची नियुक्ती करण्यासाठी संचालक मंडळाची कार्यवाही मंजूर करणे.
१०. बँकेच्या संचालक मंडळाने बँकेचे उपविधीमध्ये सुचविलेल्या दुरुस्तीस मंजूरात देणे.
११. बँकेच्या संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकाकडील कर्जाची नोंद घेणे.
१२. बँकेची नवीन शाखा अकोट जि. अकोला येथे उघडण्याकरीता केलेली संचालक मंडळाची शिफारशीला मान्यता देणे.
१३. अनुत्पादक वर्गवारीमधील वसुल न होऊ शकणारी कर्जे निर्लेखित करण्याबाबत संचालक मंडळाची शिफारशीला मान्यता देणे.
१४. बँककरीता सहाय्यक (लिपीक) पदावर कर्मचारी भरती करण्याकरीता केलेली संचालक मंडळाची शिफारशीला मान्यता देणे.
१५. बँकेच्या वार्षिक विकास आराखड्यास व दीर्घ मुदती विकास आराखड्यास मंजुरात प्रदान करणे.
**१६. मा. अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : ०५/०९/२०२६**

संचालक मंडळाचे आदेशावरुन
विजय जी. इंगळे
**प्र. कार्यकारी संचालक**

--- --

## सूचना

१) वरील सभेसाठी आवश्यक गणपूर्ती (कोरम) अभावी सभा अर्ध्या तासासाठी तहकूब करण्यात येईल व तहकूब सभा त्याच ठिकाणी त्याच दिवशी दुपारी ०१:३० वाजता वरील विषयांवर विचार करण्याकरीता घेण्यात येईल. अशा सभेस गणपूर्तीची गरज असणार नाही.
२) सभासदांना काही सूचना, ठराव इत्यादी सभेपुढे मांडावयाचे असल्यास अथवा बँकेच्या कामकाजासंबंधी प्रश्न विचारावयाचे असल्यास ते कृपया दिनांक १५.०९.२०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वा. पावेतो मुख्य कार्यालयात पोहचतील याची काळजी घ्यावी. त्यानंतर आलेल्या किंवा वेळेवर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे शक्य होणार नाही. केवळ अहवाल वर्षाशी संबंधीत प्रश्नांची उत्तरे सभागृहात देण्यात येतील. इतर प्रश्नांची उत्तरे बँकेच्या मुख्य कार्यालयामधून प्राप्त करता येतील.
३) सभासदांनी पत्ता बदलला असल्यास तसेच अद्यावत पत्त्याबाबत माहिती बँकेस द्यावी.
४) सभासदांनी वारस नेमला नसल्यास ते नेमण्याचे करावे.
५) अहवालाच्या प्रती बँकेचे मुख्य कार्यालय व सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहेत. तसेच बँकेचे संकेतस्थळ www.pducbank.com / www.pduc.bank.in वर उपलब्ध आहे.
६) भागधारक सभासदांनी याच बँकेचे शाखेतील आपला खाते क्रमांक मुख्यालयाला कळवावा.
७) खातेदारांनी संबंधीत शाखेला आपला भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल नं.) द्यावा.
८) टीडीएस कपात करणे आवश्यक असल्यामुळे पॅन क्रमांक व ईमेल (असल्यास) संबंधीत शाखेवर द्यावा.
९) ज्या खातेदाराकडे जीएसटी नं. आहे त्यांनी संबंधित शाखेवर जीएसटी नं. द्यावा.